वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत
सर्वसमावेशक कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : तांसूयो-२०२५/ प्र.क्र.९५/योजना-५**
मोती महल, २ रा मजला, १९५,
जे.टाटा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०
दिनांक : ३० सप्टेंबर, २०२५.

वाचा :-

१. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. इमाव २००३/प्र.क्र.२०५/मावक-३, दि.७ जून २००३.
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.इमाव-२००८/प्र.क्र.१८०/मावक-३, दि.१९ डिसेंबर, २००८.
३. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन निर्णय क्र. तांसुयो २०१७/प्रक्र-८४/विजाभज-१, दि.३० जानेवारी २०१८.
४. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. तांसुयो-२०१७/प्रक्र-८४/विजाभज-१, दि.१९ जानेवारी २०१९.
५. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन परिपत्रक-तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/विजाभज-१, दि.११ फेब्रुवारी, २०१९.
६. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थस-२०१९/प्र.क्र.१७०/अर्थसंकल्प, दि.०४ एप्रिल, २०१९.
७. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन निर्णय क्रमांक तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/विजाभज-१, दि.२४ जुलै, २०१९.
८. इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन परिपत्रक क्रमांक: तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/ विजाभज-१, दि.१६ फेब्रुवारी, २०२१.
९. इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र. तांसुयो-२०२१/प्र.क्र.११/विजाभज-१, दि.२३ फेब्रुवारी,२०२१.
१०. इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र. तांसुयो-२०२१/प्र.क्र.११/विजाभज-१, दि.२७ सप्टेंबर,२०२१.
११. इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्रमांक: तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/योजना-१, दि. ३० मे २०२२.
१२. इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र. तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/योजना-१, दि.२५ ऑगस्ट २०२३.

**<u>प्रस्तावना</u> :-**

महाराष्ट्र राज्यात विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गात अनेक जाती जमाती असून अद्यापही भटकंती करुन स्थलांतरीत स्वरुपाचे जीवन जगत आहेत. लमाण, बंजारा, धनगर, पारधी अशा अनेक समूहांचे तांडे / वस्त्या असून अशा तांड्यामध्ये या जाती / जमातीचे लोक अनेक वर्षांपासून राहत असले तरी अशा तांडे किंवा वस्त्यांना प्राथमिक सुविधा उपलब्ध होत नाहीत व त्यामध्ये आधुनिकतेकडे कल असला तरी या प्रवर्गातील बहुसंख्य समाज गरीबीचे जीवन जगत आहे. तांडे, वाडी किंवा वस्त्या यामध्ये सध्या या प्रवर्गातील समाज ज्या ठिकाणी वास्तव्यास आहे त्याच ठिकाणी या समाजास स्थिर जीवन जगता यावे याकरीता त्यांना काही अत्यावश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने वाचा येथील क्र.१ च्या शासन निर्णयान्वये वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना सुरु करण्यात आली आहे.

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत वाचा येथील क्र. २ ते क्र.१२ अन्वये आजतागायत कालपरत्वे सुधारणा करण्यात आल्या आहेत. सदरहू योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी यापुर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय, शुद्धीपत्रके व शासन परिपत्रके अधिक्रमीत करुन सर्वसमावेशक कार्यपद्धती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

राज्यात ग्रामीण भागातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाकरीता राबविण्यात येणारी वसंतराव नाईक तांडा/वस्ती सूधार योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याकरीता यापूर्वीचे सर्व शासन निर्णय, शुद्धिपत्रके व परिपत्रके अधिक्रमीत करून सदरहू योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे सर्वसमावेशक कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे.

१. **<u>तांडा, वाडी किंवा वस्त्यांची नावे घोषित करणे</u> :-** जनगणनेनुसार प्रत्येक गावातील तांडा / वाडी / वस्तीच्या लोकसंख्येनुसार (सद्य:स्थितीत सन २०११ च्या लोकसंख्येमध्ये १५% वाढ गृहित धरण्यात येवून) तांडा / वाडी / वस्ती म्हणून घोषित करणारा ठराव ग्रामपंचायतीने मान्य करुन तो गटविकास अधिकाऱ्यामार्फत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांच्याकडे सादर करावा. सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीसमोर मान्यतेसाठी सादर करून समितीने प्रत्येक गावातील तांडा / वाडी / वस्त्यांची नावे घोषित करावीत व त्याच्या प्रती संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना पाठवाव्यात. एकदा घोषित तांडा / वाडी / वस्त्यांना जिल्हास्तरीय

समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये अपवादात्मक परिस्थितीमध्ये सुधारणा/बदल करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीच्या शिफारशीने संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना राहतील.

२. **<u>तांडा / वाडी / वस्तीचा सांकेतांक क्रमांक</u>** :- तांडा / वाडी / वस्तीला स्वतंत्र सांकेतांक देताना "**परिशिष्ट-अ**" मधील जिल्हा व तालुका यादीतील सांकेतांक देऊन तांडा / वाडी / वस्तीचा क्रमांक पुढे जोडावा. उदा. जिल्हा सातारा मधील माण तालुक्यामधील एका गावातील "सेवालाल नगर" या तांडा वस्तीचा "००१" असा क्रमांक असेल तर सेवालाल नगर या तांडावस्तीचा सांकेतांक "१२-०६-००१" असा असेल. (जिल्ह्याचा व तालुक्याचा सांकेतांक प्रत्येकी दोन अंकी व तांडा / वाडी / वस्तीचा सांकेतांक प्रत्येकी तीन अंकी असावा).

३. **<u>पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करणे</u>** :- तांडा / वाडी / वस्त्यांची नावे घोषित होवून त्यास जिल्हास्तरीय समितीची मान्यता मिळाल्यानंतर स्थानिक परिस्थिती व गरजा लक्षात घेवून संबंधित ग्रामपंचायतीने त्या त्या तांडा / वाडी / वस्तीचा कामनिहाय बृहत आराखडा ग्रामसभा घेऊन निश्चित करावा. याकामी कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) यांचे सहाय्य घ्यावे. सदरहू पंचवार्षिक बृहत आराखडा ग्रामपंचायतीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे सादर करावा. तद्नंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी तालुकानिहाय एकत्रित बृहत आराखडा सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांच्याकडे सादर करावा. सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी सदरहू पंचवार्षिक बृहत आराखडा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीपुढे मान्यतेसाठी "**परिशिष्ट-ब**" मध्ये सादर करावा. अशाप्रकारे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या पंचवार्षिक बृहत आराखड्यास जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेवून ५ वर्षांकरीता अंतिम करावा. सदरहू पंचवार्षिक बृहत आराखड्यातील प्रत्येक पानावर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना आणि सहायक संचालक तथा सदस्य सचिव यांच्या संयुक्त स्वाक्षरीसह कार्यालयीन शिक्का असावा. सदरहू अंतिम झालेला पंचवार्षिक बृहत आराखडा सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावा. सदरहू पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये अपवादात्मक परिस्थितीत सुधारणा / बदल करणे आवश्यक असल्यास त्याबाबतचे अधिकार संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना राहतील. याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीच्या शिफारशीने आवश्यक तो प्रस्ताव संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना सादर करावा.

चालु पंचवार्षिक बृहत आराखड्याची मुदत संपुष्टात येण्यास सहा महिने कालावधी शिल्लक असतांना नवीन पंचवार्षिक बृहत तयार करण्याची कार्यवाही सुरु करण्यात यावी. नवीन पंचवार्षिक बृहत आराखडा अंतिम करण्याची कार्यवाही पुर्ण करुन सदरहू आराखडा दिनांक ०१ एप्रिल रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावा.

४. **लोकसंख्येच्या प्रमाणात अनुज्ञेय अनुदान :-** तांडा / वाडी / वस्तीला खालीलप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान अनुज्ञेय राहील -

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान (रु.लक्षमध्ये) |
|---|---|---|
| १. | ५० ते १०० पर्यंत | १५.०० |
| २. | १०१ ते १५० | २०.०० |
| ३. | १५१ व त्यापेक्षा अधिक | २५.०० |

प्रत्येक तांडा / वाडी / वस्तीला लोकसंख्येच्या निकषानुसार देय अनुदान हे पंचवार्षिक बृहत आराखड्याच्या कालावधीकरीता देय राहील. योजनेंतर्गत लोकसंख्येनुसार अनुज्ञेय पूर्ण अनुदानाचा लाभ दिल्यानंतर संबंधित तांडा / वाडी / वस्तीला त्या पंचवार्षिक बृहत आराखड्याच्या कालावधीत योजनेंतर्गत पुन्हा लाभ देण्यात येऊ नये. उदा. ८० लोकसंख्या असलेली तांडा / वाडी /वस्ती रु.१५.०० लक्ष अनुदानास पात्र आहे. अशा तांडा / वाडी / वस्तीमध्ये पंचवार्षिक बृहत आराखड्याच्या कालावधीमध्ये रु.१५.०० लक्ष इतक्याच अनुदानाची कामे घेण्यात यावीत.

५. **अनुज्ञेय विकास कामे व कामांचा प्राधान्यक्रम :-** सदरहू योजनेंतर्गत तांडा / वाडी / वस्तीमध्ये विद्युतीकरण करणे (सोलर पथदिवे / एलईडी बसविणे), पिण्याचे पाणी, अंतर्गत रस्ते (सी.सी.रोड / पेव्हर ब्लॉक बसविणे), गटारे, सार्वजनिक शौचालये, समाज मंदिर / वाचनालये, शक्य असेल तेथे मुख्य रस्त्याला जोडणारे पोहोच रस्ते, संत रामराव महाराज सभागृह बांधकाम करणे ही विकास कामे अनुज्ञेय असतील. ग्राम पंचायतीने स्थानिक परिस्थिती व गरज लक्षात घेऊन पायाभूत सुविधांची संरचना (पॅटर्न) ठरवावी. सदरहू योजनेंतर्गत पायाभूत विकास कामे खालील अग्रक्रमाने घेण्यात यावीत.

१. विद्युतीकरण (सोलार पथदिवे / एलईडी बसविणे).
२. पिण्याचे पाणी.
३. अंतर्गत रस्ते (सी.सी.रोड / पेव्हरब्लॉक बसविणे).
४. गटारे / बंदिस्त गटारे.
५. सार्वजनिक शौचालये.

६. समाज मंदिर / वाचनालय.
७. शक्य असेल तेथे मुख्य रस्त्याला जोडणारे पोहोच रस्ते.
८. संत रामराव महाराज सभागृह / समाजमंदिर बांधकाम करणे.

**६. काही विकास कामांबाबत अटी व शर्ती :-**

(६.१) पोहोच रस्ते :- सदर योजनेअंतर्गत फक्त २०० मीटर लांबीच्या पोहोच रस्त्यांची कामे हाती घेण्यात यावीत. "तांडा / वाडी / वस्तीला जोडणारा पोहोच रस्ता" असे काम मंजूर करताना सदर रस्ते हे गावातील मुख्य रस्त्यापासून जिथपर्यंत तांडा /वाडी/ वस्ती आहे तिथपर्यंत २०० मीटरच्या मर्यादेमध्ये घेण्यात यावेत. यापेक्षा जास्त लांबीच्या रस्त्यांची कामे या योजनेतून घेण्यात येऊ नयेत. बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट रस्त्यांची कामे हाती घेताना पर्जन्य जलव्यवस्थापनाचा विचार करण्यात यावा.

(६.२) संत रामराव महाराज सभागृह / समाजमंदिर :- एका महसूल गावामध्ये जरी एकापेक्षा जास्त तांडा/वाडी/वस्त्या असल्या तरी जातीय सलोख्यासाठी सदरहू गावामध्ये एकच संत रामराव महाराज सभागृह / समाजमंदिर असावे. सदरहू संत रामराव महाराज सभागृह / समाजमंदिर हे सर्व तांडा / वाडी / वस्त्यांना लाभ होईल अशा मोक्याच्या ठिकाणी असावे. तसेच सभागृहाची/समाजमंदिराची देखभाल-दुरूस्ती ही ग्रामपंचायतीने करावी. भविष्यात यावरील दुरुस्ती व देखभालीचा कोणताही खर्च या योजनेंतर्गत देय राहणार नाही.

(६.३) वाचनालय :- वाचनालयाचे काम ग्रामपंचायतीने गावातील गरजू व्यक्तीस पाहण्यास सांगावे व त्याच्या मानधनावरील खर्च ग्रामपंचायतीने स्वत:च्या उत्पन्नातून करावा.

(६.४) सदरहू योजनेंतर्गत कामे मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीच्या मर्यादेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त खर्चासाठी योजनेंतर्गत अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

**७.** संत रामराव महाराज सभागृह / समाजमंदीराच्या देखभाल व विनियोगासाठी खालीलप्रमाणे ग्रामस्तरावरील समिती स्थापन करण्यात यावी :-

१. संबंधित ग्रामपंचायती मधील सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक हे पदसिद्ध सदस्य राहतील.
२. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील निवडून आलेले तीन ग्रामपंचायत सदस्य हे या समितीचे सदस्य राहतील, यामध्ये एक महिला सदस्य असणे अनिवार्य राहील.

३. संबंधित ग्रामपंचायतीने ग्रामसभेद्वारे गावातील तीन विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील व्यक्तींची सदस्य म्हणून निवड करावी. वरील परिच्छेद क्र. दोनमध्ये नमूद निर्वाचित महिला सदस्य उपलब्ध न झाल्यास या तीन सदस्यांपैकी एक महिला उमेदवाराची निवड करण्यात यावी. ग्रामसभेतून निवड केलेल्यांपैकी एकाची समिती अध्यक्ष म्हणून निवड करावी.

४. वर नमूद परिच्छेद क्र. तीन मधील सदस्यांची निवड करतांना तो/ती किमान पदवीधर असावा, सामाजिक कार्याची आवड असणे आवश्यक, त्याचबरोबर तो/ती निर्व्यसनी, गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेला व स्वच्छ चारित्र्याचा असणे अनिवार्य राहील.

५. या समितीचा कार्यकाळ हा ग्रामपंचायतीच्या कार्यकाळाएवढा राहील. सदरहू इमारत बांधकामाच्या विनियोगाबाबत व देखभालीबाबत सर्व जबाबदारी सदरहू समितीची राहील.

६. सदरहू सभागृह / समाजमंदीराचा कोणताही राजकीय उपयोग करण्यास मनाई राहील.

७. सभागृह / समाजमंदीराच्या बांधकामाकरीता संबंधित ग्रामपंचायतीने पुरेशा प्रमाणात जागा उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

८. **<u>जिल्हास्तरीय समितीची रचना</u>** :- वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्ह्याचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करणे, तांडा/वाडी/वस्त्यांची नावे घोषीत करणे, बृहत आराखड्यानुसार कामांचा प्राधान्यक्रम व निकड विचारात घेवून विकास कामांची निवड करणे, शिफारशीसह कामांचा प्रस्ताव सादर करणे आणि कामांची गुणवत्ता व इतर संनियंत्रणाबाबत योग्य त्या उपाययोजना करण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती राहील. सदरहू समितीची किमान प्रत्येक ४ महिन्यामध्ये बैठक आयोजित करण्यात यावी. जिल्हास्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे असेल -

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५. | जिल्हा नियोजन अधिकारी | सदस्य |
| ६. | संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी | सदस्य |

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| ७. | प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण | सदस्य |
| ८. | संबंधित जिल्हयाचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण | सदस्य सचिव |

९. <u>**बंजारा बहुल ११ जिल्ह्यांकरीता अशासकीय समिती**</u> **:-** वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजनेंतर्गत प्रस्तावित करावयाची कामे संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीस सुचविण्याकरीता राज्यातील बंजारा बहुल ११ जिल्ह्यांमध्ये (यवतमाळ, जालना, नांदेड, परभणी, बीड, सोलापूर, छ.संभाजीनगर, लातूर, हिंगोली, बुलडाणा आणि वाशिम) बंजारा समाजातील व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे “वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजना अशासकीय समिती” असेल-

| अ.क्र. | प्रतिनिधींचे नाव | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | संबंधित जिल्ह्यातील बंजारा समाजातील व्यक्ती | अध्यक्ष |
| २. | विमुक्त जाती प्रवर्गातील ०१ व्यक्ती | सदस्य |
| ३. | भटक्या जामाती प्रवर्गातील ०१ व्यक्ती | सदस्य |
| ४. | विमुक्त जाती/ भटक्या जमाती प्रवर्गातील ०१ महिला | सदस्य |
| ५. | संबंधित जिल्हयाचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण | सदस्य सचिव |

“वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजना अशासकीय समितीबाबत” खालीलप्रमाणे तरतुदी असतील-

१. बंजारा बहुल जिल्ह्यामध्ये स्थापन करावयाच्या समितीमधील अध्यक्ष आणि सदस्यांच्या निवडीबाबतचा प्रस्ताव आवश्यक सर्व कागदपत्रांसह (उदा.जात प्रमाणपत्र, चारित्र्य पडताळणी अहवाल, रहिवासी प्रमाणपत्र, परिचय पत्र इ.) संबंधित जिल्ह्याच्या सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा. सदरहू समितीमधील अध्यक्ष / सदस्य नियुक्तीबाबत शासनाकडून यथायोग्य निर्णय घेण्यात येईल.

२. सदरहू समितीचा कार्यकाळ हा अडीच वर्षांचा असेल.

३. सदरहू समितीने विकास कामे सुचवितांना कामे पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट आहेत, यापुर्वी मंजुर झालेली नाहीत, सुरू किंवा पुर्ण झालेली नाहीत, अशा कामांना इतर कोणत्याही योजनेमधून निधी मिळालेला नाही तसेच सदरहू कामे एका विशिष्ट प्रकारचीच नाहीत इ. बाबी विचारात घेवून सर्व तांडा / वस्त्यांचा समतोल विकास होईल अशा कामांची निवड करण्याची दक्षता घ्यावी.

४. सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी बंजारा बहूल ११ जिल्ह्यांमध्ये पंचवार्षिक बृहत आराखड्यानुसार विकास कामांचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीपुढे मान्यतेकरीता सादर करण्यापूर्वी त्या कामांबाबत अशासकीय समितीची शिफारस घ्यावी. तसेच अशासकीय समितीने शासनाच्या धोरणानुसार शिफारस केलेल्या कामांचा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने तपासणी करुन प्राधान्याने प्रस्तावामध्ये समावेश करावा.

१०. **तालुकास्तरीय समिती** :- वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजनेंतर्गत प्रस्तावीत करावयाची कामे संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीस सुचविण्याकरीता राज्यातील बंजारा बहुल ११ जिल्हे वगळून उर्वरित जिल्ह्यांमध्ये खालीलप्रमाणे तालुकास्तरीय समिती कार्यरत राहील.

| अ.क्र. | प्रतिनिधींचे नाव | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | संबंधित जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांनी नेमलेले विधानसभा सदस्य (तालुका निहाय) | अध्यक्ष |
| २. | संबंधित जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता (निवडण्यात येणाऱ्या कामाशी संबंधीत) | सदस्य |
| ३. | संबंधित तहसिलदार | सदस्य |
| ४. | सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण | सदस्य |
| ५. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती | सदस्य सचिव |

सदरहू समितीने विकास कामे सुचवितांना सदरहू कामे पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट आहेत, यापुर्वी मंजुर झालेली नाहीत, सुरू किंवा पुर्ण झालेली नाहीत, अशा कामांना इतर कोणत्याही योजनेमधून निधी मिळालेला नाही तसेच सदरहू कामे एका विशिष्ट प्रकारचीच नाहीत

इ. बाबी विचारात घेवून सर्व तांडा / वस्त्यांचा समतोल विकास होईल अशा कामांची निवड करण्याची दक्षता घ्यावी.

११. **<u>ग्रामपंचायतीने गट विकास अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यपद्धती</u>** :- वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजनेंतर्गत पंचवार्षिक बृहत आराखड्यात समाविष्ट असलेल्या विकास कामांबाबत पुढील बाबींची पुर्तता करूनच प्रस्ताव गट विकास अधिकारी यांच्याकडे सादर करावेत-

१. ग्रामसभा ठराव :- ग्रामसभेने पंचवार्षिक आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या कामांसंबंधी तांडा /वाडी / वस्तीची निकड व योजनेंतर्गत कामांचा प्राधान्यक्रम लक्षात घेवून कामाच्या मागणीसंबंधी आणि "वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या कामाची देखभाल व दुरुस्ती संबंधित ग्रामपंचायतीच्या निधीतून करण्यात येईल" असा ठराव ग्रामसभेमध्ये करावा. सदरहू ठरावाची प्रत प्रस्तावासह जोडण्यात यावी.

२. मागणी केलेले काम यापुर्वी अन्य योजनेतून करण्यात आले नाही किंवा अन्य योजनेतून निधी मंजूर झालेला नाही, असे प्रमाणपत्र ग्रामपंचायतीने प्रस्तावासोबत जोडावे.

३. तांडा / वाडी / वस्तीमध्ये मागणी केलेल्या कामाचे सविस्तर स्वरुप नमूद करावे. (उदा. श्री..... यांच्या घरापासून ते श्री.... यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे).

४. कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यता :- विहीत वित्तीय मर्यादेनूसार कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम) / कार्यकारी अभियंता (जिल्हा परिषद) / उपअभियंता (सार्वजनिक बांधकाम) / उपअभियंता (जिल्हा परिषद) यांचेकडील कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यता प्रस्तावासोबत जोडावे.

५. स्थळ पाहणी अहवाल :- कामासाठी जागा उपलब्ध असल्याचे Geotagging केलेली छायाचित्रे व जागेच्या उताऱ्यासह उपअभियंता (बांधकाम)/ कनिष्ठ अभियंता (सार्वजनिक बांधकाम) / कनिष्ठ अभियंता (पंचायत समिती) यांचेकडील स्थळ पाहणी अहवाल जोडावा.

६. कामासाठी मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होत असल्यास सदरहू खर्च ग्रामंपचायत निधीतून करण्यात येवून काम पूर्ण करण्याबाबतचे हमीपत्र सोबत जोडावे.

१२. **<u>शासनास प्रस्ताव सादर करण्याची कार्यपद्धती</u> :-**

पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या विकास कामांची निवड करुन सदरहू कामे शिफारशीसह प्रस्तावित करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीस राहतील. जिल्हास्तरीय समितीने निवड करुन शिफारस केलेल्या कामांचा

प्रस्ताव सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग व संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांचेमार्फत शासनास सादर करावा. संबंधित जिल्ह्याच्या सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी पुढील बाबींची पुर्तता करूनच प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करावेत-

१. प्रस्तावातील प्रत्येक पानावर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आणि सहायक संचालक तथा सदस्य सचिव यांची संयुक्त स्वाक्षरी व कार्यालयीन शिक्का असावा. प्रस्तावातील प्रत्येक पानावर पान क्रमांक नमूद असावा. ( उदा प्रस्तावामध्ये एकूण २० पाने असल्यास २० पैकी १, २० पैकी २ ....... याप्रमाणे.)

२. प्रस्ताव सादर करतांना जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडणे आवश्यक आहे. सदरहू बैठकीच्या इतिवृत्तामध्ये संबंधित सदस्यांना बैठकीस उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेल्या पत्राचा दिनांक, उपस्थित सदस्यांची स्वाक्षरीसह नावे, बैठकीमध्ये सदस्यांनी दिलेले अभिप्राय / सूचना यांचा समावेश असावा.

३. योजनेंतर्गत आजपावेतो लाभापासून वंचित असलेल्या तांडा / वाडी / वस्तीमधील कामे प्रथमत: प्रस्तावित करण्यात यावीत.

४. प्रस्तावित करण्यात आलेली कामे यापुर्वी अन्य योजनेतून करण्यात आलेली नाहीत किंवा अन्य योजनेतून निधी मंजूर झालेला नाही, याबाबतचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

५. तांडा / वाडी / वस्तीला लोकसंख्येनुसार अनुज्ञेय निधीपेक्षा जास्त रक्कमेची कामे प्रस्तावित करण्यात आली नसल्याची खातरजमा करुन प्रमाणित करावे.

६. तांडा / वाडी / वस्तीला लोकसंख्येनुसार अनुज्ञेय पूर्ण अनुदानाचा लाभ दिल्यानंतर त्या पंचवार्षिक बृहत आराखड्याच्या कालावधीत संबंधित तांडा / वाडी / वस्तीतील कामे प्रस्तावित करण्यात येऊ नयेत.

७. योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांचे सविस्तर स्वरुप (उदा. श्री...... यांच्या घरापासून ते श्री.....यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे) प्रस्तावात स्पष्ट नमूद करण्यात यावे.

८. यापुर्वी तांडा / वाडी/ वस्तीध्ये मंजूर झालेले काम पूर्ण झाले नसेल तर अशा तांडा / वाडी / वस्तीमध्ये नवीन काम प्रस्तावित करण्यात येऊ नये.

९. योजनेंतर्गत विशिष्ट तालुक्यांतील कामांचे प्रस्ताव सादर न करता, सर्व तालुक्यांतील कामांचा समावेश करुन जिल्ह्याचा एकत्रित परिपुर्ण प्रस्ताव सादर करण्यात यावा.

१०. उपरोक्त नमूद अटींच्या पुर्ततेसह सोबत जोडण्यात आलेल्या **"परिशिष्ट-क"** मधील नमुन्यामध्ये योजनेंतर्गत नवीन कामांचे प्रस्ताव शासनास सादर करावेत. तसेच प्रस्ताव सादर करतांना योजनेंतर्गत मागील वर्षात प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामांचा सद्य:स्थितीदर्शक अहवाल प्रथमत: **"परिशिष्ट-ड"** मध्ये सोबत जोडण्यात यावा. विहित नमुन्यात नसलेले आणि मागील मंजूर कामांच्या सद्य:स्थितीदर्शक अहवालाशिवाय कोणतेही प्रस्ताव संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडून स्विकारण्यात येवू नयेत.

**१३. अर्थसंकल्पीत निधीचे समन्यायी वितरण :-** वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजनेंतर्गत राज्यातील सर्वच तांडा / वाडी / वस्त्यांना मुलभूत पायाभुत सुविधा उपलब्ध होऊन योजनेचा हेतू साध्य होण्यासाठी योजनेंतर्गत आर्थिक वर्षाकरीता करण्यात आलेल्या तरतुदीचे समन्यायपद्धतीने वाटप होण्याकरीता प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला (माहे एप्रिलमध्ये) सदरहू योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्याकरीता उपलब्ध होणाऱ्या निधीबाबत संबंधितांना अवगत करण्यात येईल. त्यानुसार उपलब्ध होणाऱ्या निधीच्या दोन पट रक्कमेच्या कामांचे प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी सादर करावेत. प्रस्तावामध्ये सर्व तालुक्यांतील कामांचा समावेश करण्यात आला असल्याची खातरजमा करुन सदरहू प्रस्ताव दिनांक ३१ मे पर्यंत शासनास प्राप्त होतील यानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच, जिल्हानिहाय उपलब्ध होणाऱ्या निधीचे प्रमाण आवश्यकतेनुसार कमी / जास्त करण्याचे अधिकार शासनास राहतील.

**१४. कामांची निवड करताना जिल्हास्तरीय समितीने तांडा / वाडी/ वस्तीबाबत लक्षात घ्यावयाचा प्राधान्यक्रम** :- जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने शिफारस / प्रस्तावित करावायाच्या कामांच्या तांडा / वाडी/ वस्त्यांबाबत खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम ठरवावा-

१. गावातील ज्या तांडा / वाडी / वस्त्यांना अद्यापही योजनेंतर्गत लाभापासून वंचित असलेल्या व एकदाही लाभ दिला नाही अशा तांडा / वाडी / वस्त्या.

२. लोकसंख्येनुसार अनुज्ञेय अनुदानाचे लाभ देणे बाकी आहे अशा तांडा / वाडी / वस्त्या.

३. एकदा लाभ दिलेल्या तांडा / वाडी / वस्त्या व त्यानंतर दोनदा लाभ दिलेल्या तांडा / वाडी / वस्त्या.

१५. **<u>प्रशासकीय मान्यता व निधी वितरणाचे अधिकार</u> :-** जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मान्यता देवून प्रस्तावित केलेल्या कामांची आवश्यकतेनुसार निवड करुन प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर करण्याचे अधिकार शासनास राहतील.

तसेच, सदरहू योजनेंतर्गत पुर्ण झालेल्या कामांना उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांच्याकडून प्राप्त प्रस्तावांना निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही विभागाच्या सचिव स्तरावरुन करण्यात येईल.

१६. **<u>निधी वितरणावरील नियंत्रण आणि आहरण व संवितरणाबाबत</u> :-** सदर योजनेंतर्गत निधी वितरीत करण्यासाठी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना "नियंत्रक अधिकारी" आणि संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

१७. **<u>निविदा प्रक्रीया</u> :-** सदर योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या विकास कामांकरीता अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेची प्रक्रीया ही विहीत वित्तीय मर्यादेनुसार कार्यकारी अभियंता (सा.बां.) / उपअभियंता (सा.बां.) / कार्यकारी अभियंता (जिल्हा परिषद) / उपअभियंता (पंचायत समिती) यांचेमार्फत राबविण्यात यावी. तसेच, सदरहु योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामांसाठी विहीत वित्तीय मर्यादेनुसार निविदा प्रक्रिया सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी उपअभियंता (सा.बां.) /उपअभियंता (पंचायत समिती) यांच्या सहकार्याने राबवावी.

१८. **<u>कार्यारंभ आदेश</u> :-** सदरहू योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामांचे कार्यारंभ आदेश प्रशासकीय मान्यता आदेशाच्या दिनांकापासून २ महिन्यांच्या आत संबंधित सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी द्यावेत.

१९. **<u>काम पुर्णत्वाचा कालावधी</u> :-** सदर योजनेअंतर्गत कामे कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासून १ वर्षाच्या आत पूर्ण करणे बंधनकारक राहील. विहित केलेल्या कालावधीत ग्रामपंचायतीच्या सहाय्याने काम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी ही संबंधित सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण व उपअभियंता (सा.बां./जि.प.) यांची राहील. तसेच, विहित कालावधीमध्ये तांडा /

वाडी / वस्तीमधील काम अपूर्ण राहिल्यास संबंधित ग्रामपंचायतीस पुढील दोन वर्षाकरिता योजनेंतर्गत कामासाठी निधी देण्यात येऊ नये.

२०. **काम बदल :-** वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामामध्ये कोणत्याही परिस्थितीत परस्पर बदल करण्यात येवू नये. परस्पर बदल केलेल्या कामांना कोणत्याही परीस्थितीत निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत काम बदल करणे आवश्यक असल्यास त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने बैठकीच्या इतिवृत्तासह शासनास सादर करावा. परंतु, कार्यारंभ आदेश झालेल्या कामांच्या बदलाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येवू नये.

२१. **कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणे :-** सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी VPDA द्वारे संबंधितांना निधी अदा करावा. सदरहू योजनेअंतर्गत कामाच्या पुर्णत्वाच्या टप्प्यानूसार निधी वाटपाचे प्रमाण ५०: ५० असे राहील. सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी कामाच्या मंजूर निधीच्या ५०% निधी संबंधितांस कार्यारंभ आदेशासोबत उपलब्ध करुन द्यावा. तसेच सदरहू काम पुर्ण झाल्यानंतर खालील नमूद कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर उर्वरित ५०% निधी मागणीचा प्रस्ताव "**परिशिष्ट-इ**" मधील विवरणपत्रामध्ये शासनास सादर करावा.

१. काम पुर्णत्वाचा दाखला.
२. मोजमाप नोंदवहीची छायांकीत प्रत (Measurement Book).
३. मुल्यांकन दाखला.
४. स्थळ पाहणी अहवाल.
५. काम हस्तांतरण दाखला/ताबा पावती.
६. काम सुरू करण्याआधीची व काम पुर्ण झाल्यानंतरची Geotagging केलेली छायाचित्रे.
७. नामफलक/कोनशिलेची छायाचित्रे.
८. उपयोगिता प्रमाणपत्र.

२२. **निधी वळता न करणे** :- सदर योजनेंतर्गत पायाभूत विकास कामांसाठी वितरीत करण्यात आलेला निधी कोणत्याही परिस्थितीत इतर प्रयोजनासाठी वळविण्यात येवू नये. तसेच, सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी योजनेंतर्गत ज्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे त्याच कामासाठी वापरण्याची दक्षता घ्यावी. परस्पर अन्य कामासाठी निधी वळता केल्यास सदरहू बाब वित्तीय अनियमितता म्हणून समजण्यात येईल.

२३. **<u>अखर्चीत निधी</u> :-** सदरहू योजनेंतर्गत पुर्ण झालेल्या कामांच्या निधीबाबत तसेच अखर्चित निधीबाबत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी नियमितपणे आढावा घेवून याबाबतची माहिती संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे व शासनास न चुकता सादर करावी. तसेच, अखर्चित निधी वित्त विभागाच्या प्रचलित धोरणानुसार शासनखाती जमा करावा.

२४. **<u>उपयोगिता प्रमाणपत्र</u> :-** सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी सदरहू योजनेंतर्गत खर्च झालेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना नियमितपणे सादर करावे. निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या कामाशी संबंधित यंत्रणेवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच योजनेंतर्गत कामासाठी उपलब्ध निधी, अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका इ. कागदपत्रे संबंधित ग्रामपंचायत कार्यालयामध्ये नागरिकांसाठी उपलब्ध करुन द्याव्यात.

२५. **<u>नामफलक / कोनशिला</u> :-** सदर योजनेअंतर्गत काम पूर्ण झाल्यानंतर घेण्यात आलेल्या कामाचा सविस्तर तपशिल व झालेला खर्च याची माहिती देण्यासाठी कोनशिला/नामफलक बसविण्यात यावा. सदर कामाच्या ठिकाणी “हे काम वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजनेंतर्गत पुर्ण करण्यात आले आहे" असे वाक्य कोनशिला / नामफलकावर तैल रंगामध्ये नमुद करण्यात यावे. तसेच सदर नामफलकावर कामाचे नाव, कामाची किंमत, कंत्राटदाराचे नाव, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, कार्यारंभ आदेशाचा दिनांक व काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक अंदाजित कालावधी या बाबींचा उल्लेख असावा.

२६. सदरहू योजनेतंर्गत पूर्ण झालेल्या विकास कामांचा सविस्तर तपशील मोजमाप पुस्तिकेसह ग्रामसभेसमोर ठेवण्यात यावा.

२७. **<u>विकास कामावर निरीक्षण, संनियंत्रण, देखरेख</u> :-** सदर योजनेअंतर्गत कामांवर देखरेख, निरीक्षण व संनियंत्रणाची जबाबदारी ही संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण व कार्यकारी अभियंता (सा.बां./जि.प.) यांची राहील.

२८. **<u>कामांची तपासणी</u> :-** सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या सर्व तांडा / वाडी / वस्त्यांमधील विकास कामांची तपासणी संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी करावी. सदरील कामांपैकी १०% कामांची तपासणी संबंधित प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग यांच्यामार्फत व ५% कामांची तपासणी ही संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत करण्यात यावी.

२९. **कामांचा मासिक प्रगती अहवाल** :- सदर योजनेअंतर्गत संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी कामांचा मासिक प्रगती अहवाल संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांचेमार्फत "**परिशिष्ट-फ**" मधील विहीत नमुन्यामध्ये दरमहा न चुकता शासनास सादर करतील.

३०. **लेखाशिर्ष** :- या योजनेवरील यावरील खर्च "मागणी क्र. झेडजी-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ८०-सर्वसाधारण, १०२-स्वयंसेवी संस्थांना मदत, (०२) तांडा वस्ती सुधार योजना, (०२) (०१) विजाभज आणि विमाप्र यांच्यासाठी तांडा वस्ती सुधार योजना (कार्यक्रम), ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) (कार्यक्रम) (दत्तमत) (२२२५ एफ ०५८)" या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध आर्थिक तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९३०१७४६११३९३४ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVINDRA RAMDAS PETKAR

Digitally signed by RAVINDRA RAMDAS PETKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OBC, 2.5.4.20=02221E63DEDA18472966F6CEBA0E52B81716756B206278E1F5BD437FE438C944, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=93D05A1F2A6CEAD3ED9E358A4D06E909B2A25FE9A918A443E6204CD5D72B0ED9, cn=RAVINDRA RAMDAS PETKAR
Date: 2025.09.30 17:48:20 +05'30'

**( र.रा.पेटकर )**
**शासनाचे उपसचिव**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई..
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मा. मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

१२. सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मंबई.
१४. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.
१५. जिल्हाधिकारी (सर्व).
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१७. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग (सर्व).
१८. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
१९. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२०. प्रादेशिक उपसंचालक (सर्व), इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग.
२१. तहसिलदार (सर्व).
२२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व).
२३. सहायक संचालक (सर्व), इतर मागास बहुजन कल्याण विभाग.
२४. सहायक आयुक्त (सर्व), समाज कल्याण विभाग.
२५. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२६. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
२७. प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय यांचे स्विय सहायक.
२८. सर्व मंत्रालीयन विभाग.
२९. सर्व सह सचिव / उप सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०. निवडनस्ती (योजना-५).

**परिशिष्ट-अ**

**तांडा/वाडी/वस्तीचा सांकेतांक क्रमांक**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ०१ | ठाणे | ०१ |
| | | | मुरबाड | ०२ |
| | | | अंबरनाथ | ०३ |
| | | | उल्हासनगर | ०४ |
| | | | कल्याण | ०५ |
| | | | शहापूर | ०६ |
| | | | भिवंडी | ०७ |
| २ | पालघर | ०२ | पालघर | ०१ |
| | | | वसई | ०२ |
| | | | वाडा | ०३ |
| | | | मोखाडा | ०४ |
| | | | जव्हार | ०५ |
| | | | विक्रमगड | ०६ |
| | | | डहाणू | ०७ |
| | | | तलासरी | ०८ |
| ३ | रायगड | ०३ | अलिबाग | ०१ |
| | | | उरण | ०२ |
| | | | पनवेल | ०३ |
| | | | कर्जत | ०४ |
| | | | खालापूर | ०५ |
| | | | पेन | ०६ |
| | | | सुधागड | ०७ |
| | | | रोहा | ०८ |
| | | | माणगाव | ०९ |
| | | | तळा | १० |
| | | | महाड | ११ |
| | | | पोलादपूर | १२ |
| | | | म्हसळा | १३ |
| | | | श्रीवर्धन | १४ |
| | | | मुरुड | १५ |
| | | | रत्नागिरी | ०१ |
| | | | गुहाघर | ०२ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ४ | रत्नागिरी | ०४ | दापोली | ०३ |
| | | | मंडनगड | ०४ |
| | | | खेड | ०५ |
| | | | चिपळूण | ०६ |
| | | | संगमेश्वर | ०७ |
| | | | लांजा | ०८ |
| | | | राजपूर | ०९ |
| ५ | सिंधुदुर्ग | ०५ | कणकवली | ०१ |
| | | | कुडाळ | ०२ |
| | | | सावंतवाडी | ०३ |
| | | | दोडा मार्ग | ०४ |
| | | | वेंगुर्ला | ०५ |
| | | | मालवण | ०६ |
| | | | देवगड | ०७ |
| | | | वैभववाडी | ०८ |
| ६ | नाशिक | ०६ | नाशिक | ०१ |
| | | | पेठ | ०२ |
| | | | सुरगाणा | ०३ |
| | | | कळवण | ०४ |
| | | | बागलाण | ०५ |
| | | | मालेगाव | ०६ |
| | | | चांदवड | ०७ |
| | | | नांदगाव | ०८ |
| | | | येवला | ०९ |
| | | | निफाड | १० |
| | | | सिन्नर | ११ |
| | | | इगतपुरी | १२ |
| | | | देवळा | १३ |
| | | | त्र्यंबकेश्वर | १४ |
| | | | दिंडोरी | १५ |
| ७ | धुळे | ०७ | धुळे | ०१ |
| | | | साक्री | ०२ |
| | | | शिंदखेडा | ०३ |
| | | | शिरपूर | ०४ |
| | | | नंदुरबार | ०१ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ८ | नंदुरबार | ०८ | शहादा | ०२ |
| | | | नवापूर | ०३ |
| | | | तळोदा | ०४ |
| | | | धडगाव | ०५ |
| | | | अक्कलकुवा | ०६ |
| ९ | जळगाव | ०९ | जळगाव | ०१ |
| | | | चोपडा | ०२ |
| | | | जामनेर | ०३ |
| | | | रावेर | ०४ |
| | | | मुक्ताईनगर | ०५ |
| | | | भुसावळ | ०६ |
| | | | बोदवड | ०७ |
| | | | यावल | ०८ |
| | | | पाचोरा | ०९ |
| | | | चाळीसगाव | १० |
| | | | भडगाव | ११ |
| | | | पारोळा | १२ |
| | | | एरंडोल | १३ |
| | | | धरणगाव | १४ |
| | | | अंमळनेर | १५ |
| १० | अहिल्यानगर | १० | नगर | ०१ |
| | | | राहुरी | ०२ |
| | | | श्रीरापमूर | ०३ |
| | | | राहाता | ०४ |
| | | | नेवासा | ०५ |
| | | | शेवगाव | ०६ |
| | | | पाथर्डी | ०७ |
| | | | जामखेड | ०८ |
| | | | कर्जत | ०९ |
| | | | श्रीगोंदा | १० |
| | | | पारनेर | ११ |
| | | | अकोले | १२ |
| | | | संगमनेर | १३ |
| | | | कोपरगाव | १४ |
| | | | पुणे शहर | ०१ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ११ | पुणे | ११ | हवेली | ०२ |
| | | | खेड | ०३ |
| | | | आंबेगाव | ०४ |
| | | | जुन्नर | ०५ |
| | | | शिरुर | ०६ |
| | | | दौंड | ०७ |
| | | | इंदापूर | ०८ |
| | | | बारामती | ०९ |
| | | | पुरंदर | १० |
| | | | भोर | ११ |
| | | | वेल्हे | १२ |
| | | | मुळशी | १३ |
| | | | मावळ | १४ |
| १२ | सातारा | १२ | सातारा | ०१ |
| | | | वाई | ०२ |
| | | | खंडाळा | ०३ |
| | | | कोरेगाव | ०४ |
| | | | फलटण | ०५ |
| | | | माण | ०६ |
| | | | खटाव | ०७ |
| | | | कराड | ०८ |
| | | | पाटण | ०९ |
| | | | जावळी | १० |
| | | | महाबळेश्वर | ११ |
| १३ | सांगली | १३ | मिरज | ०१ |
| | | | तासगाव | ०२ |
| | | | पलुस | ०३ |
| | | | खानापूर | ०४ |
| | | | आटपाडी | ०५ |
| | | | जत | ०६ |
| | | | कवळे-महांकाळ | ०७ |
| | | | वाळवा | ०८ |
| | | | शिराळा | ०९ |
| | | | कडेगाव | १० |
| | | | उत्तर सोलापूर | ०१ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १४ | सोलापूर | १४ | बार्शी | ०२ |
| | | | अक्कलकोट | ०३ |
| | | | मंगळवेढा | ०४ |
| | | | सांगोला | ०५ |
| | | | माळशिरस | ०६ |
| | | | पंढरपुर | ०७ |
| | | | माहोळ | ०८ |
| | | | दक्षिण सोलापूर | ०९ |
| | | | करमाळा | १० |
| | | | माढा | ११ |
| १५ | कोल्हापूर | १५ | करवीर | ०१ |
| | | | पन्हाळा | ०२ |
| | | | हातकणंगले | ०३ |
| | | | शिरोळ | ०४ |
| | | | कागल | ०५ |
| | | | गडहिंग्लज | ०६ |
| | | | चंदगड | ०७ |
| | | | आजरा | ०८ |
| | | | भुदरगड | ०९ |
| | | | राधानगरी | १० |
| | | | गगनबावडा | ११ |
| | | | शाहूवाडी | १२ |
| १६ | छ.संभाजीनगर | १६ | छ.संभाजीनगर | ०१ |
| | | | खुलताबाद | ०२ |
| | | | कन्नड | ०३ |
| | | | सोयगाव | ०४ |
| | | | सिल्लोड | ०५ |
| | | | पैठण | ०६ |
| | | | गंगापूर | ०७ |
| | | | वैजापूर | ०८ |
| | | | फुलंब्री | ०९ |
| | | | जालना | ०१ |
| | | | अंबड | ०२ |
| | | | जाफ्राबाद | ०३ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १७ | जालना | १७ | परतूर | ०४ |
| | | | भोकरदन | ०५ |
| | | | बदनापूर | ०६ |
| | | | घनसावंगी | ०७ |
| | | | मंठा | ०८ |
| १८ | परभणी | १८ | परभणी | ०१ |
| | | | जिंतूर | ०२ |
| | | | गंगाखेड | ०३ |
| | | | पाथ्री | ०४ |
| | | | सेलू | ०५ |
| | | | मानवत | ०६ |
| | | | पालम | ०७ |
| | | | सोनपेठ | ०८ |
| | | | पुर्णा | ०९ |
| १९ | हिंगोली | १९ | हिंगोली | ०१ |
| | | | कळमनुरी | ०२ |
| | | | वसमत | ०३ |
| | | | औंढा नागनाथ | ०४ |
| | | | सेनगाव | ०५ |
| २० | बीड | २० | बीड | ०१ |
| | | | गेवराई | ०२ |
| | | | माजलगाव | ०३ |
| | | | अंबेजोगाई | ०४ |
| | | | केज | ०५ |
| | | | पाटोदा | ०६ |
| | | | आष्टी | ०७ |
| | | | धारुर | ०८ |
| | | | परळी | ०९ |
| | | | वडवणी | १० |
| | | | शिरुर कासार | ११ |
| | | | नांदेड | ०१ |
| | | | हदगाव | ०२ |
| | | | किनवट | ०३ |
| | | | भोकर | ०४ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| २१ | नांदेड | २१ | बिलोली | ०५ |
| | | | देगलूर | ०६ |
| | | | मुखेड | ०७ |
| | | | कंधार | ०८ |
| | | | लोहा | ०९ |
| | | | अर्धापूर | १० |
| | | | हिमायतनगर | ११ |
| | | | माहूर | १२ |
| | | | उमरी | १३ |
| | | | धर्माबाद | १४ |
| | | | नायगाव | १५ |
| | | | मुदखेड | १६ |
| २२ | धाराशिव | २२ | धाराशिव | ०१ |
| | | | उमरगा | ०२ |
| | | | लोहारा | ०३ |
| | | | तुळजापूर | ०४ |
| | | | भूम | ०५ |
| | | | परांडा | ०६ |
| | | | कळंब | ०७ |
| | | | वाशी | ०८ |
| २३ | लातूर | २३ | लातूर | ०१ |
| | | | अहमदपूर | ०२ |
| | | | उदगीर | ०३ |
| | | | निलंगा | ०४ |
| | | | औसा | ०५ |
| | | | चाकूर | ०६ |
| | | | रेणापूर | ०७ |
| | | | देवणी | ०८ |
| | | | शिरुर | ०९ |
| | | | जळकोट | १० |
| | | | चिखली | ०१ |
| | | | देऊळगाव राजा | ०२ |
| | | | बुलढाणा | ०३ |
| | | | खामगाव | ०४ |
| | | | मोताळा | ०५ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| २४ | बुलढाणा | २४ | मलकापूर | ०६ |
| | | | मेहकर | ०७ |
| | | | शिंदखेड राजा | ०८ |
| | | | लोणार | ०९ |
| | | | मलकापूर | १० |
| | | | संग्रामपूर | ११ |
| | | | शेगाव | १२ |
| | | | नांदुरा | १३ |
| २५ | अकोला | २५ | अकोला | ०१ |
| | | | बार्शी टाकळी | ०२ |
| | | | पातूर | ०३ |
| | | | मुर्तिजापूर | ०४ |
| | | | बाळापूर | ०५ |
| | | | अकोट | ०६ |
| | | | तेल्हारा | ०७ |
| २६ | वाशिम | २६ | वाशिम | ०१ |
| | | | मालेगाव | ०२ |
| | | | रिसोड | ०३ |
| | | | मंगरुळपीर | ०४ |
| | | | मानोरा | ०५ |
| | | | कारंजा लाड | ०६ |
| २७ | अमरावती | २७ | अमरावती | ०१ |
| | | | नांदगाव खांडेश्वर | ०२ |
| | | | भातकुली | ०३ |
| | | | अचलपुर | ०४ |
| | | | चांदूर बाजार | ०५ |
| | | | मोर्शी | ०६ |
| | | | वरुड | ०७ |
| | | | चांदूर रेल्वे | ०८ |
| | | | तिवसा | ०९ |
| | | | दर्यापूर | १० |
| | | | अंजनगाव | ११ |
| | | | चिखलदरा | १२ |
| | | | धारणी | १३ |
| | | | धामणगाव रेल्वे | १४ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| २८ | यवतमाळ | २८ | यवतमाळ | ०१ |
| | | | बाभुळगाव | ०२ |
| | | | कळंब | ०३ |
| | | | केळापूर | ०४ |
| | | | राळेगाव | ०५ |
| | | | घाटंजी | ०६ |
| | | | वणी | ०७ |
| | | | मोरेगाव | ०८ |
| | | | पुसद | ०९ |
| | | | महागाव | १० |
| | | | उमरखेड | ११ |
| | | | दारव्हा | १२ |
| | | | कळंब | १३ |
| | | | दिग्रस | १४ |
| | | | आर्णी | १५ |
| | | | झरी जामणी | १६ |
| २९ | वर्धा | २९ | वर्धा | ०१ |
| | | | देवळी | ०२ |
| | | | समुद्रपूर | ०३ |
| | | | सेलू | ०४ |
| | | | कारंजा | ०५ |
| | | | आष्टी | ०६ |
| | | | हिंगणघाट | ०७ |
| | | | आर्वी | ०८ |
| ३० | नागपूर | ३० | नागपूर | ०१ |
| | | | नागपूर शहर | ०२ |
| | | | कामठी | ०३ |
| | | | हिंगणा | ०४ |
| | | | मौदा | ०५ |
| | | | नरखेड | ०६ |
| | | | सावनेर | ०७ |
| | | | कळमेश्वर | ०८ |
| | | | रामटेक | ०९ |
| | | | पारसिवनी | १० |
| | | | मोंदा | ११ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | | | उमरेड | १२ |
| | | | भिवपूर | १३ |
| | | | कुहा | १४ |
| ३१ | भंडारा | ३१ | भंडारा | ०१ |
| | | | पवनी | ०२ |
| | | | तुमसर | ०३ |
| | | | मोहाडी | ०४ |
| | | | साकोली | ०५ |
| | | | लाखंदूर | ०६ |
| | | | लाखनी | ०७ |
| ३२ | गोंदिया | ३२ | गोंदिया | ०१ |
| | | | गोरेगाव | ०२ |
| | | | तिरोडा | ०३ |
| | | | अर्जुनी मोरगाव | ०४ |
| | | | देवरी | ०५ |
| | | | सडक अर्जुनी | ०६ |
| | | | आमगाव | ०७ |
| | | | सालेकसा | ०८ |
| ३३ | चंद्रपूर | ३३ | चंद्रपूर | ०१ |
| | | | गोंडपिंपरी | ०२ |
| | | | मूल | ०३ |
| | | | सावली | ०४ |
| | | | वरोरा | ०५ |
| | | | जिवती | ०६ |
| | | | भद्रावती | ०७ |
| | | | ब्रम्हपुरी | ०८ |
| | | | सिंदेवाही | ०९ |
| | | | नागभीड | १० |
| | | | राजूरा | ११ |
| | | | कोपरना | १२ |
| | | | बल्लारपुर | १३ |
| | | | चिमुर | १४ |
| | | | पोंभुर्णा | १५ |
| | | | गडचिरोली | ०१ |
| | | | चामोर्शी | ०२ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्ह्याचा सांकेतांक क्रमांक | तालुक्याचे नाव | तालुक्याचा सांकेतांक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ३४ | गडचिरोली | ३४ | धानोरा | ०३ |
| | | | कुरखेडा | ०४ |
| | | | आरमोरी | ०५ |
| | | | सिरोंचा | ०६ |
| | | | अहेरी | ०७ |
| | | | एटापल्ली | ०८ |
| | | | मुलचेरा | ०९ |
| | | | भामरागड | १० |
| | | | देसाईगंज | ११ |
| | | | कोरची | १२ |

***

<u>परिशिष्ट-ब</u>

पंचवार्षिक बृहत आराखडा नमुना

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव | एकूण विजाभज लोकसंख्या | एकूण तांडा/ वाडी/ वस्तीची संख्या | तांडा/ वाडी/ वस्तीचे नाव | तांडा/ वाडी/ वस्तीचा सांकेतांक क्रमांक | जनगणनेनूसार तांडा/वाडी/वस्तीची लोकसंख्या | | | तांडा/वाडी/वस्तीला यापूर्वी दिलेल्या लाभाचे स्वरूप | | | | प्रस्तावित बृहत आराखडयानूसार तांडा/ वाडी/वस्तीमध्ये आवश्यक कामाचे स्वरुप | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | ५० ते १०० | १०१ ते १५० | १५१ पेक्षा जास्त | वर्ष | कामाचे नाव | प्राप्त निधी | झालेला खर्च | वर्ष | प्रस्तावित कामाचे नाव | प्रस्तावित कामासाठी येणारा खर्च | लोकसंख्ये नूसार अनुज्ञेय रक्कम | ग्रामपंचायत ठराव क्रमांक व दिनांक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |

(स्वाक्षरी)
सहाय्यक संचालक,

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, ….

(स्वाक्षरी)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,

वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजना, …

## परिशिष्ट-क

### वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन ------ करीता प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित कामांची यादी

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव | तांडा/ वाडी/ वस्तीचे नाव/ लोकसंख्या | बृहत आराखडया नुसार तांडा/ वाडी/ वस्तीचा सांकेतांक क्रमांक | लोकसंख्येच्या प्रमाणात देय निधी (रू.लक्षमध्ये) | तांडा/ वाडी/ वस्तीला चालू पंचवार्षिक आराखड्याच्या कालावधीमध्ये (५ वर्षात) देण्यात आलेला निधी (रु.लक्ष) | कामाचे स्वरूप (करावयाचे सविस्तर काम) | कामाची किंमत (रू.लक्ष) | शेरा / स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
| | | | | | | | | | | |

टिप- रकाना क्र.७ येथे कामाचे स्वरुप सविस्तर नमूद करण्यात यावे. (उदा. फताटेवाडी येथे आनंद राठोड यांचे घर ते संतोष राठोड यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता तयार करणे)

(स्वाक्षरी)
सहाय्यक संचालक,
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, ….

(स्वाक्षरी)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजना, …..

## परिशिष्ट-ड

## वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत मागील वर्षात प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामांचा सद्य:स्थितीदर्शक अहवाल

| अ. क्र. | शासन निर्णय दिनांक | शासन निर्णयातील कामाचा क्रमांक | जिल्हा | तालुका | ग्राम पंचायतीचे नाव | तांडा / वस्तीचे नाव | कामाचे नाव / स्वरुप | प्र.मा. नुसार कामास मंजुर निधी (रु.लक्ष) | मंजुर निधीपैकी शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी (रु.लक्ष) | मंजुर निधीपैकी अद्याप शासनाने उपलब्ध न करुन दिलेला निधी (रु.लक्ष) | कार्यारंभ आदेशाचा दिनांक | कामाची सद्य:स्थिती पुर्ण / अपुर्ण | काम पुर्ण झाले असल्यास पुर्ण झाल्याचा दिनांक | काम अपुर्ण असल्यास पुर्णत्वाची टक्केवारी | अपुर्ण कामांची कारण मिमांसा | कामाचा निधी कोषागारातून आहरित केल्याचा दिनांक | कामाच्या पुर्ततेनुसार संबंधित यंत्रणेस वितरीत करण्यात आलेला निधी (रु.लक्ष) | संबंधित यंत्रणेस अदा करण्यास शिल्लक राहिलेला निधी (रु.लक्ष) | कार्यारंभ आदेशापासून १ वर्षात काम पुर्ण झाले आहे काय (होय/ नाही) | काम विहित मुदतीत पुर्ण केले नसल्यास करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील | काम विहित मुदतीत केले नसल्यास संबंधित ग्रामपंचाय तीचा पुढील २ वर्षाकरीता अपात्र यादीमध्ये समावेश होतो काय (होय/ नाही) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

(स्वाक्षरी)

सहाय्यक संचालक,

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, ....

# परिशिष्ट-इ

## वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेअंतर्गत पुर्ण झालेल्या कामांचा उर्वरित निधी मागणी प्रस्ताव

| अ. क्र. | शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक | शासन निर्णयातील कामाचा अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव | तांडा वस्तीचे नाव व लोकसंख्या | कामाचा तपशील | कामाची किंमत (रू.लक्षमध्ये) | कार्यारंभ आदेश दिल्याचा जावक क्रमांक व दिनांक | शासन स्तरावरून उपलब्ध करून दिलेला निधी (रू.लक्षमध्ये) | उर्वरित आवश्यक निधी (रु.लक्षमध्ये) | खर्च केलेला निधी (रु.लक्षमध्ये) | शिल्लक असलेला निधी (रू.लक्षमध्ये) | कामाची भौतिक स्थिती (पुर्ण/ अपुर्ण/ प्रगतीपथावर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

(स्वाक्षरी)

सहाय्यक संचालक

इतर मागास बहुजन कल्याण ---

## परिशिष्ट-फ

## वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामांचा सद्य:स्थितीदर्शक अहवाल

| अ. क्र. | वर्ष | शासन निर्णयाचा दिनांक | प्रशासकीय मान्यता प्राप्त एकूण मंजूर कामांची संख्या | शासन निर्णयानुसार मंजूर एकूण निधी (रू.लक्षमध्ये) | शासनाकडून उपलब्ध करून दिलेला निधी (रू.लक्षमध्ये) | शासनाकडून अप्राप्त निधी (रू.लक्षमध्ये) (५-६) | कार्यारंभ आदेश दिलेल्या कामांची संख्या | कार्यारंभ आदेश न दिलेल्या कामांची संख्या | कार्यारंभ आदेश दिलेल्या कामांपैकी पुर्ण कामांची संख्या | कार्यारंभ आदेश दिलेल्या कामांपैकी अपुर्ण कामांची संख्या | सहाय्यक संचालकांकडून संबंधित यंत्रणेस अदा करण्यात आलेला निधी (रू.लक्षमध्ये) | सहाय्यक संचालक यांचेकडे शिल्लक असलेला निधी (रू.लक्षमध्ये) (६-१२) | सहाय्यक संचालकांनी समर्पित केलेला निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | |

सही
सहाय्यक संचालक
इतर मागास बहुजन कल्याण ......

*********